आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र -रात्री ८.०५ वाजता

२ जून २०२५ - सोमवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि पॅराग्वेचे अध्यक्ष सँटियागो पेना पॅलासिओस यांच्यात नवी दिल्लीत द्विपक्षीय बैठक, संयुक्त आयोगाच्या स्थापनेसाठी उभय देशांमधे सामंजस्य करार

- दहशतवाद विरोधी पथकाकडून ठाणे जिल्ह्यात १२ संशयितांना अटक

- छत्तीसगडमधे सुकमा जिल्ह्यात १६ माओवाद्यांचं पोलीसांपुढं आत्मसमर्पण

आणि

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी उद्या रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू आणि पंजाब किंग्ज यांच्यात लढत

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि पॅराग्वेचे अध्यक्ष सँटियागो पेना पॅलासिओस यांच्यात आज नवी दिल्लीत झालेल्या द्विपक्षीय बैठकीत व्यापार, संरक्षण, आरोग्य, रेल्वे, अंतराळ, कृषी, स्वच्छ ऊर्जा, हायड्रोजन आणि जैव इंधन या क्षेत्रांशी संबंधित मुद्द्यांवर चर्चा झाली. भारत आणि पॅराग्वे यांनी संयुंक्त राष्ट्रांसह विविध बहुपक्षीय संघटनांमध्ये समान हिताच्या मुद्द्यांवर काम करण्याची तयारी दर्शवली आहे. दोन्ही देश डिजिटलीकरण आणि माहितीआधारीत संवाद तंत्रज्ञान वाढवण्यावर काम करत आहेत. यावेळी भारत आणि पॅराग्वे यांच्यात संयुक्त आयोगाच्या स्थापनेसाठी एका सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली.

यापूर्वी पॅराग्वेच्या अध्यक्षांनी राजघाटाला भेट देऊन महात्मा गांधींना श्रद्धांजली अर्पित केली. ते राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचीही भेट घेणार आहेत. पॅराग्वेला परतण्यापूर्वी ते मुंबईलाही भेट देणार असून या भेटीत ते राजकीय नेते, व्यावसायिक तसंच विविध उद्योगांचे प्रतिनिधी आणि तंत्रज्ञान क्षेत्रातल्या व्यक्तींची भेट घेतील.

**<><><><>**

जागतिक हवाई वाहतूक उद्योगात भारताचं महत्त्व वाढलं आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. नवी दिल्लीतील भारत मंडपम इथे IATA अर्थात आंतरराष्ट्रीय हवाई वाहतूक संघटनेच्या ८१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते आज बोलत होते. जागतिक हवाई वाहतूक उद्योगात भारत एक आघाडीची शक्ती म्हणून उदयाला येत आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले. 'उडान' योजना ही भारताच्या हवाई वाहतूक क्षेत्रातलं सुवर्णपान असून देशांतर्गत विमान वाहतूक क्षेत्रात भारताने जगात तिसऱ्या क्रमांकावर झेप घेतल्याचं त्यांनी सांगितलं. पुढच्या पाच वर्षात देशात ५० विमानतळ विकसित करणार असल्याची घोषणा यावेळी नागरी विमान वाहतूक मंत्री के राममोहन नायडू यांनी केली. यावर्षीच्या एप्रिल महिन्यापर्यंत देशांतर्गत विमान वाहतुकीत १० टक्के वाढ झाल्याचं नायडू यांनी सांगितलं.

**<><><><>**

दहशतवादाशी संबंधित एका प्रकरणात महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकानं ठाणे जिल्ह्यात छापेमारी करून १२ संशयितांना अटक केली. दहशतवाद विरोधी पथकानं साकिब नाचण, अकिब साकिब नाचण, अब्दुल लतीफ कासकर, कैफ नाचण, शाजील नाचण, फारक झुबेर मुल्ला यांच्यासह प्रतिबंधित संघटना सिम्मीच्या काही माजी पदाधिकाऱ्यांच्या घरांची आणि परिसराची झडती घेतली. झडती दरम्यान ६ जण त्यांच्या घरात आढळले नाहीत. ए टी एस नं पुढील तपासासाठी १२ जणांना अटक केली आहे.

**<><><><>**

नागालँड विधानसभेतल्या सात आमदारांनी केलेल्या पक्षांतराला आव्हान देण्यासाठी अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सर्व पर्यायांचा विचार करत आहे, असं पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस ब्रिजमोहन श्रीवास्तव यांनी काल भोपाळ इथं बातमीदारांशी बोलताना सांगितलं. पक्षांतरविरोधी कायद्याखाली हे प्रकरण

तपासलं जाईल, यासाठी शक्य ते कायदेशीर पाऊल उचललं जाईल, असं श्रीवास्तव यांनी सांगितलं. एनडीपीपी ने युती धर्माचं उल्लंघन केल्याचा आरोपही राष्ट्रवादी काँग्रेसनं केला आहे.

**<><><><><>**

वैद्यकीय पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी येत्या १५ तारखेला होणार असलेली NEET परीक्षा पुढं ढकलली आहे. राष्ट्रीय आयुर्विज्ञान परीक्षा मंडळानं याबाबत प्रसिद्धीपत्रक जारी केलं आहे. अधिक परीक्षा केंद्रं आणि पायाभूत सुविधांची व्यवस्था करण्यासाठी परीक्षा पुढं ढकलली आहे. परीक्षेची नवी तारीख लवकरच जाहीर केली जाईल, असं या प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

छत्तीसगडमधे सुकमा जिल्ह्यात १६ माओवाद्यांनी आज पोलीस आणि केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या अधिकाऱ्यांपुढं आत्मसमर्पण केलं. यापैकी ६ जणांवर २५ लाख रुपयांचं ईनाम जाहीर केलं होतं. या माओवाद्यांवर विविध नक्षली कारवायांमधे सामील असल्याचा आरोप आहे. शरणागती पत्करलेल्या माओवाद्यांना, छत्तीसगड सरकारच्या पुनर्वसन धोरणानुसार प्रत्येकी ५० हजार रुपये तसंच इतर सुविधा दिल्या जाणार आहेत.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत उद्या रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू आणि पंजाब किंग्ज यांच्यात अहमदाबाद इथल्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर अंतिम सामना होणार आहे. बेंगळुरू संघाचं नेतृत्व रजत पाटीदार याच्याकडे आहे तर पंजाब किंग्जचं कर्णधारपद श्रेयस अय्यर याच्याकडे आहे. फलंदाजी आणि गोलंदाजी या विभागांमध्ये दोन्ही संघ समान आहेत. विशेष म्हणजे २००८मध्ये सुरू झालेल्या आयपीएल क्रिकेट स्पर्धेत हे दोन्ही संघ एकदाही करंडक जिंकू शकलेले नाहीत. त्यामुळे दोन्ही संघांसाठी हा विजय महत्त्वाचा ठरणार आहे.

**<><><><><>**

सिक्कीमच्या मांगन जिल्ह्यात चाटेन इथल्या लष्करी तळावर काल संध्याकाळी दरड कोसळल्यामुळे ढिगाऱ्याखाली अडकलेल्या जवानांचा शोध आणि बचावकार्य भर पावसात सुरु आहे.

धुवाधार पाऊस कोसळत असला तरी बचावकार्य सुरु आहे. आतापर्यंत ४ जवानांना सुरक्षित बाहेर काढण्यात आलं असून ३ जवानांचे मृतदेह मिळाले आहेत. खाली अडकलेल्या आणखी सहा जणांना वाचवण्याचे प्रयत्न सुरु आहेत. मरण पावलेल्या ३ जवानांबद्दल लष्कराने दुःख व्यक्त केलं असून या कठीण प्रसंगात लष्कर आपल्या जवानांच्या पाठीशी राहील असं लष्कराच्या प्रवक्त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><>**

पोलंडच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत लॉ ऍण्ड जस्टीस पार्टीच्या पाठिंब्यावर उभे असलेले अपक्ष उमेदवार करोल नावरोकी यांनी विजय मिळवला आहे. त्यांना एकूण मतदानाच्या ५० पूर्णांक ८९ शतांश टक्के मतं मिळाली. आपले प्रतिस्पर्धी राफाल ट्रजस्कोवस्की यांच्यापेक्षा दोन टक्के मतं मिळवून नावरोकी यांनी निवडणुकीत यश संपादन केलं. पोलंडचे सध्याचे राष्ट्राध्यक्ष अंद्रेज दुदा यांचा कार्यकाळ ६ ऑगस्ट रोजी संपल्यानंतर नावरोकी राष्ट्राध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारतील.

**<><><><>**

अन्नधान्य साठवणुकीसाठी केंद्र सरकारची योजना म्हणजे प्रधानमंत्री मोदी यांच्या 'सहकाराद्वारे समृद्धी' या ध्येयाप्रती टाकलेलं मोठं पाऊल आहे, असं केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे. जगातल्या सर्वात मोठ्या सहकारी अन्नधान्य साठवणूक योजनेच्या नवी दिल्लीत आज झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. या योजनेमुळे देशभरातल्या प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांचं उत्पन्न वाढेल आणि ग्रामीण भागात रोजगार निर्माण होतील असं ते म्हणाले.

**<><><><><>**

शेतकऱ्यांच्या समृद्धीसह देशाच्या अन्नसुरक्षेबाबत सरकार वचनबद्ध आहे, असं केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी सांगितलं. ते आज बिहारमधे मोतिहारी इथं शेतकऱ्यांचं जीवनमान उंचावण्याबाबत आयोजित चर्चासत्रात बोलत होते.

विकसित भारताचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विकसित शेती आणि समृद्ध शेतकरी असणं आवश्यक आहे, देशभरात १६ हजार शास्त्रज्ञ थेट शेतकऱ्यांशी संवाद साधत  आहेत. उत्पादनात वाढ करणं, उत्पादन खर्च कमी करणं, आणि शेतमालासाठी दर निश्चित करणं यावर ते काम करत असल्याचं कृषीमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल यांनी आज पॅरिसमध्ये जागतिक पातळीवरच्या आघाडीच्या कार्यकारी अधिकाऱ्यांची भेट घेतली. भेटीत त्यांनी इलेक्ट्रिक वाहनं आणि अक्षय्य उर्जा अशा क्षेत्रांमध्ये भारतीय बाजारपेठेसाठी भविष्यातल्या गुंतवणूक योजनांचा आढावा घेतला. ते उद्या जागतिक व्यापार संघटनेच्या मंत्रिस्तरीय बैठकीलाही उपस्थित राहणार आहेत.

**<><><><><>**

केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी आज नॉर्वेतल्या ओस्लो इथं जपानचे आंतरराष्ट्रीय व्यवहार उपमंत्री टेराडा योशिमिची यांच्याबरोबर द्विपक्षीय बैठक घेतली. दोन्ही नेत्यांनी  या बैठकीत गुंतवणूक, बंदरांचं डिजिटलीकरण आणि हरित बंदर उपक्रमात सहयोग, संशोधन आणि विकास सहयोगात वाढ, मानव संसाधनांचा कौशल्य विकास तसंच जपानमध्ये भारतीय नाविकांना रोजगाराच्या संधी अशा विविध मुद्द्यांवर चर्चा केली.

**<><><><><>**

इस्तंबुलच्या सिरागन पॅलेस इथं आजपासून रशिया आणि यूक्रेनच्या शिष्टमंडळांमध्ये शांतता चर्चेचा दुसरा टप्पा सुरू होत आहे. रशियाच्या शिष्टमंडळाचं नेतृत्व रशियाच्या प्रधानमंत्र्यांचे सहाय्यक व्लादिमीर मेडिन्स्की करतील तर युक्रेनच्या शिष्टमंडळाचं नेतृत्व संरक्षण मंत्री रुस्तेम उमरोव्ह यांच्याकडे आहे. तुर्कीएचे परराष्ट्र मंत्री हकान फिदान या चर्चेत सूत्रसंचालक असणार आहेत.

**<><><><><>**

श्रीलंकेच्या जनगणना आणि आकडेवारी विभागानं जारी केलेल्या अहवालानुसार श्रीलंकेच्या एकूण महागाई दरात वाढ झाली आहे. मे महिन्यात तो उणे ७ दशांश वर पोहोचला आहे. अन्नधान्य महागाई दर मे मधे ५ पूर्णांक २ दशांश टक्के, तर इतर महागाई दर उणे ३ पूर्णांक ३ दशांश टक्के आहे. श्रीलंकेची केंद्रीय बँक महागाई दर लवकरच सकारात्मक होईल अशी अपेक्षा करीत आहे.

//<><><><><>//